# गॅस चेंबर

(जगद्‌विख्यात रहस्यकथालेखक - जेम्स हॅडली चेस
याच्या कादंबरीचा अनुवाद)


लेखक

**जेम्स हॅडली चेस**

स्वैर अनुवाद

**मधुकर हुद्दार**



**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B 273

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**गॅस चेंबर : मधुकर हुद्दार**
© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ २००/-

# गॅस चेंबर

## एक

व्हिक्टर  डरमॉट हा लॉस एंजेलिसमधील धनवंतांच्या परिसरात राहणारा एक प्रसिद्ध नाटककार होता. अमेरिकेतील साहित्य क्षितिजावर त्याचं नाव सर्वश्रेष्ठ नाटककार या नात्यानं प्रकाशमान होतं. गेल्या दहा वर्षात त्याचं प्रत्येक नाटक प्रेक्षकांनी अक्षरश: डोक्यावर घेतलं होतं. परिणामी अमाप प्रसिद्धी व संपत्ती त्याला प्राप्त झाली होती. मानसन्मानाला तर सीमाच नव्हती.

'देता किती घेशील दो कराने'– असं म्हणत निसर्गानं त्याच्यावर सद्‍गुणांची वृष्टी केली होती, परंतु प्रसिद्धी व दौलतीची नशा त्याला कधीच चढली नाही. शांत, सालस, संयमी व निरहंकारी असा त्याचा स्वभाव होता. सामान्यत: कीर्ती व दौलतीची नशा चढलेले कलावंत, हे काजव्यासारखे अल्पकाळ चमकतात, पण शेवटी त्यांचा अंत विस्मृतीच्या अंधारातच होतो. व्हिक्टर डरमॉट या पतनशील मालिकेतला नव्हता. त्याचं आगळंवेगळं असं विश्व होतं.

त्याची पत्नी केरी तरुण व सुंदर होती. एका लहानशा गोंडस बाळाचं आगमन तिच्या संसारात झालं होतं. व्हिक्टरसारखा नवरा अन् मातृत्वाची वात्सल्यमय इच्छा पूर्ण करणारं सुंदर, गोंडस बाळ, आणखीन काय हवं? व्हिक्टरचं आपल्या या लहानशा कुटुंबावर जिवापाड प्रेम होतं. केरीलाही व्हिक्टरबद्दल भलताच अभिमान होता.

व्हिक्टरचं वय अडतीसच्या आसपास होतं. तो सहा फूट उंच, सावळा, धष्टपुष्ट व अतिशय देखणा होता. समोरच्यावर शंभर टक्के प्रभाव टाकणारं असं त्याचं विलोभनीय व्यक्तिमत्त्व होतं. त्याचा चेहरामोहरा बराचसा ग्रेगरी पेकसारखा

होता. त्यामुळे तो बाहेर पडला की, असंख्य तरुण-तरुणी, शाळकरी पोरं-पोरी त्याच्याभोवती जमून ऑटोग्राफ मागत. त्याला या गोष्टीचा वीट आला होता. पण कुणाचं मन दुखवायचं नाही, हा त्याचा स्वभाव! यामुळे लोकांच्या मनात त्याच्याविषयी अपार आदर होता.

गेल्या काही दिवसांपासून व्हिक्टरच्या मनात, एक नवीन नाटकाची बीजं अंकुरत होती. त्याला हे नाटक शांत-निवांतपणे लिहायचं होतं, परंतु सतत येणारे फोन, मित्रवर्ग व बाहेरचा कोलाहल, यामुळे हवी ती शांतता मिळणं, निदान शहरात तरी शक्य नव्हतं. व्हिक्टरला लेखनासाठी शांत नि नीरव जागा हवी होती. त्यानं आपली सेक्रेटरी वेरा सिंडरला बोलावलं. ती स्टडीरूममध्ये येताच तो म्हणाला,

''वेरा, मला फक्त तीन महिन्यांसाठी शहरापासून दूर अशा शांत एकांतस्थळी एखादी जागा हवी आहे. एक नवीन नाटक लिहायचंय. समजलं ना?''

''येस सर, काही एजंट्सला भेटून मी करते सारं,'' असं म्हणून परत जायला वळण्यापूर्वी वेरानं विचारलं,

''सर, आपण एकटेच जाणार की, विथ फॅमिली?''

''मी सहकुटुंब जाणार केरीला हा चेंज आवडेल.'' वेरा आपल्या खोलीत गेली. वेरानं दोनच दिवसात एका फार्म हाऊसची व्यवस्था केली. आपल्या व्हिक्टर साहेबांकडून उत्तम नाटक लिहिलं जावं; असं तिच्या श्रद्धायुक्त मनालाही वाटत होतं.

वेरानं पसंत केलेलं हे फार्म हाऊस, नेव्हेडा वाळवंटाच्या सीमेवर होतं. इथून पिट सिटी पन्नास मैल व बोस्टन क्रीक अवघ्या वीस मैलाच्या अंतरावर होतं. शिवाय पिट सिटीत दैनंदिन गरजेच्या सर्वच वस्तू मिळत असल्यामुळे वेराला ही जागा सोयीची वाटली. बोस्टन क्रीकमध्ये मात्र एक सर्व्हिस स्टेशन, कॉफी हाऊस व दोन जनरल स्टोअर्स, एवढीच सोय होती.

या फार्म हाऊसचं नाव 'वेस्ट लॅन्ड' होतं. ज्या वृद्ध जोडप्याच्या मालकीचं ते होतं. ते नेहमी फिरतीवर असत. त्यामुळे व्हिक्टर डरमॉटसारख्या लोकप्रिय नाटककाराला, तीन महिन्यांच्या करारावर ते देण्यात, त्यांना आनंदच झाला होता.

वेस्ट लॅन्डला जाण्यापूर्वी व्हिक्टर अन् केरीनं ही जागा एकदा डोळ्यांखालून घालण्याचा निर्णय घेतला व ते तिथं पोचले. एकूण सर्वच चांगले होतं. या फार्म हाऊसमध्ये एक बैठकीचा हॉल, एक स्टडीरूम, तीन मोठ्या बेडरूम्स, एक सर्व सोयींनी युक्त किचन, एक स्विमिंग पूल, कार्ससाठी चार गॅरेज, एक टेनिस कोर्ट आणि मागील भागात पाच सर्व्हन्टस् क्वार्टर्सची सोय होती.

फार्म हाऊसपर्यंत येणारा रस्ता कच्चा म्हणजे नुसता मातीचा व बराच लांब होता. या रस्त्याच्या शेवटी दुसऱ्या कच्चा रस्त्याशी जुळून पुढं तो पिट सिटीकडे जात होता.

व्हिक्टर व केरीला हे फार्म हाऊस खूपच आवडलं. परतीच्या प्रवासात व्हिक्टरनं केरीला सहज म्हणून विचारलं.

''केरी डिअर, तुला इथं बोअर तर वाटणार नाही ना? कारण नाटक लिहिण्यात मी गुंतलेला असेन आणि...'' केरीनं त्याला मधेच रोखलं अन् उत्तरली,

''मी तुझ्यासाठी कॉफी, ब्रेकफास्ट, जेवण तयार करीन. बाळाशी खेळीन, शिवाय तुझं नाटक टाईप करून देत जाईन. मग बोअर कशी होणार?''

यावर व्हिक्टरजवळ बोलण्यासारखं काहीच नव्हतं. तो फक्त एवढंच म्हणाला, ''गुड, मग गेल्याबरोबर तयारीला लागा. आपला व्हिएतनामी नोकर डिलांग आपल्या सोबत राहील. जवळ काही शस्त्रं, बंदुका वगैरे असणंही आवश्यक वाटतं. तसं भिण्यासारखं काही कारण नाही. शिवाय डिलांग हा उत्तम मोटर मेकॅनिक आहेच- बाजारहाट करायला तू त्याच्याबरोबर पिटी सिटीला जाऊ शकतेस. ओ.के. देन - आपण सारेच येऊ.'' रात्री नवाला ते घरी पोचले.

एक-दोन दिवसांत आवश्यक त्या वस्तूंची खरेदी करून, व्हिक्टर डरमॉट आपलं कुटुंब व व्हिएतनामी नोकर डिलांगला घेऊन, वेस्ट लॅन्डला डेरेदाखल झाला.

पहिल्या दिवशी तर व्हिक्टर व डिलांगने सभोवतालचा संपूर्ण परिसर आपल्या सुरक्षितेच्या दृष्टीने पाहून समाधानाचा नि:श्वास सोडला. डिलांगची सोय मागील क्वार्टरमध्ये केली. सोबत व्हिक्टरचा लाडका कुत्राही होता. डिलांग त्याचं सारं काही प्रेमानं करीत असे. इथं तर त्याचीच सोबत होती.

पुढील दोन महिने व्हिक्टरनं स्वत:ला स्टडीरूममध्ये कोंडूनच घेतलं होतं. फक्त ब्रेकफास्ट व जेवणासाठी तो बाहेर येई. जास्तच थकवा वाटला तर केरीबरोबर टेनिसचा एखादा गेम व नंतर टँकमध्ये यथेच्छ पोहून तो पुन्हा स्टडीत अदृश्य होई. केरी व बाळाची भेट फक्त रात्री.

या दोन महिन्यांत अविश्रांत परिश्रम करून व्हिटरनं आपलं नाटक पूर्ण केलं. केरीला त्यानं प्रत्येक अंक वाचून दाखविला होता. आता फक्त तो नाटकावरून शेवटचा हात फिरवीत होता. कुठं उणीव राहायला नको, कारण प्रतिष्ठेचा प्रश्न ना? नाटक उत्तमच झालं होतं. लॉस एंजेलिसला जाताच, रिहर्सलसाठी ते प्रोड्युसरकडे रवाना करायचं, एवढंच काय ते काम राहिलं होतं. हे नाटक हिट होणार व सर्वांगसुंदर ठरणार, असा सार्थ विश्वास त्याला वाटत होता.

नाटक संहिता बॅगमध्ये कुलूपबंद करून व्हिक्टर किचनमध्ये आला. त्याचा प्रसन्न व आत्मतृप्त चेहरा पाहून केरीला आनंद झाला. ती वेगानं येऊन व्हिक्टरला बिलगली अन् म्हणाली,

''डिअर, नाटक मनासारखं झाल्याचा आनंद होतोय ना?''

''हो, इथं सारंच मनासारखं होतंय. हनीमूननंतर एवढं शांत व तृप्त बरेच दिवसांनंतर वाटतंय. किती आगळंवेगळं वाटतं ना इथं?''

''खरंय. माझ्या मनातलं बोललास. शहरी कोलाहलापासून दूर, ना फोन ना पार्ट्या. मला खूपच आवडली ही जागा पण! एका आठवड्यानं परतायचं ना?''

''कराराप्रमाणं हो. पण पाय निघत नाही इथून. ओ.के. ज्युनिअर काय म्हणतो?''

''स्वारी गाढ झोपली आहे. इथं आल्यापासून रडणं कमी झालंय खरं. पाखरांचे आवाज आले की, तो खिडकीकडे बघतो, टपोऱ्या डोळ्यांनी.''

''छान, आता जेऊया आपण, खूप भूक लागली आहे.''

केरीनं डिशेस डायनिंग टेबलावर ठेवल्या. सर्व पदार्थमध्ये ठेवून दोघेही जेवू लागले. जेवताना व्हिक्टर एकाएकी गंभीर झाला व म्हणाला,

''केरी, हा व्हिएतनामी डिलांग आताशा अधिकच चिडचिडा झालाय, त्याला थोडा हिसका द्यायला हवा.''

''छे रे ऽऽ काहीतरीच काय. इथं आपण एकमेकाला. तो बिचारा एकतर एकटाच. कंटाळला असेल. त्याला रागावू नकोस.''

दोघेही पोटभर जेवून झोपायला गेली. व्हिक्टरला उशीवर डोकं टेकताच गाढ झोप लागली. केरीनं बाळाला पोटाशी घेतलं. कुरवाळलं अन् तीही झोपेच्या आधीन झाली.

हा जुलैचा महिना होता. या शांत झोपलेल्या सुखी जिवांच्या नशिबाचं चक्र पहाटे पाचपासून उलटं फिरायला लागलं. जे घडलं ते असं...

व्हिक्टर डरमॉट पहाटे एकाएकी उठून बसला. तो खूपच घाबरलेला होता. सर्वांग घामानं डबडबलं होतं. आपल्याला काय झालंय? असं का होतंय? हेच त्याला कळेना. त्यानं घाम पुसला. पण छातीचा भाता भीतीनं जास्तच धडधडत होता. आपल्याला आठवत नसलं तरी एखादं भयानक स्वप्न आपण पाहिलं असणार, असा विचार त्याच्या मनात आला व त्यानं केरीकडे पाहिलं. बाळाला पोटाशी घेऊन ती शांत झोपली होती.

व्हिक्टर सतर्क होऊन तसाच पडून राहिला. सर्वत्र शांत होतं. आवाज फक्त टिकटिक करणाऱ्या घड्याळाचा व घर्रऽऽ असा फ्रिजचा. या व्यतिरिक्त कुठलाच आवाज त्याला ऐकू येत नव्हता. अस ंअसलं तरी त्याला शांत बसवेना. तो अंगावरील चादर दूर करून पलंगावरून उतरला. गाऊन घातला. पायात स्लीपर्स सरकावून तो मांजरीच्या पावलानं लॉबीत आला. तिथं काहीच नाही, ही खात्री होताच तो बैठकीत आला. बैठकीच्या एका खिडकीपाशी येऊन तो थबकला. अन् हलकेच त्यानं खिडकी उघडली. बाहेर चांदण्यांचा धूसर प्रकाश पडला होता. त्यातून डिलांगचं क्वार्टर स्पष्ट दिसत होतं. तिथं सारं शांत शांत होतं. डिलांग साडेसातच्या आधी कधी उठत नाही, हे ठाऊक असल्यामुळे, व्हिक्टरनं हाक मारली नाही.

तो आता अधिकच बेचैन झाला होता. मानसिक अस्वस्थता क्षणाक्षणाला जाणवत होती. किचनमध्ये जाऊन गरम-गरम कॉफी घ्यावी असं वाटल्यामुळे तो किचनकडे वळला. परंतु कॉफी तयार करण्यापूर्वी आपल्या अंत: चेतनेला साद देत त्यानं मागच्या आवाराकडील दार उघडलं.

मागील आवार जिथं संपतं, तिथं एक मोठं दार होतं. ते नेहमीच उघडं राहत असे. कारण व्हिक्टरचा अल्सेशिअन कुत्रा- ब्रुनो याला सर्व बाजूला फिरत राखणं

करता यावी, हा हेतू. ब्रुनोची आराम करण्याची व झोपण्याची जागाही इथंच होती. व्हिक्टरने कुत्र्याला बोलवायला शीळ घातली. एरवी शिटीचा आवाज ऐकताच शेपटी हलवत येणारा ब्रुनो, या वेळी आता नाही. तोही गाठ झोपला असवा, असं वाटून व्हिकटर मागे वळला अन् प्लग स्विच ऑन करून त्यांन कॉफी पर्कोलेटर सुरू केलं. कॉफी पिऊन त्यानं ब्रुनोचा नाश्ता तयार केला व एका पातेल्यात तो घेऊन, ते पातेलं दाराशी ठेवून दिलं.

आता काय करावं? याचा विचार करीतच तो बाथरूममध्ये शिरला. शॉवरखाली बराच वेळ स्नान केल्यानंतर त्याचं डोकं थोडं शांत झालं खरं; परंतु मनातली अस्वस्थता संपलेली नव्हती. व्हिक्टर कपडे करत तातडीनं बाहेर आला व किचनमधील पर्कोलेटरचा प्लग काढताना नकळत त्याचं लक्ष दाराकडे गेलं, ब्रुनोच्या नाश्त्याचं पातेलं तसंच भरलेलं होतं. असं कधी होत नसे. व्हिक्टरची शीळ ऐकताच तो उड्या मारत येई अन् खाणं होताच रिकाम्या पातेल्याशी खेळत असे. पण या वेळी असं काहीच न घडल्यामुळे व्हिक्टरच्या मनात शंकाकुशंकाचं वादळ उफाळू लागलं.

तो अधिकच चिंतित झाला. बाहेरच्या आवारात– जिथं ब्रुनोचं खोपटं होतं. तिथंही व्हिक्टरनं पाहिलं. पण ते रिकामं होतं. ब्रुनोचा कुठंच पत्ता नव्हता. व्हिक्टर वेड्यासारखा इकडून तिकडे शोधाशोध करीत होता. पण व्यर्थ.

कदाचित एखाद्या मांजरीच्या मागे पळत लांबवर गेला असावा, अशी मनाची समजूत करून तो आपल्या स्टडीत गेला नि आपल्या नाटकाच्या शेवटच्या अंकाचं वाचन करू लागला. त्याची नजर हस्तलिखितावर होती, पण प्रत्यक्षात त्याचं लक्ष वाचनात नव्हतंच. काही केल्या त्याला या मानसिक अस्वस्थतेचं रहस्य कळत नव्हतं.

व्हिक्टर नाटकाची प्रत सुरक्षित ठेवून पुन्हा किचनमध्ये आला नि कॉफी मगमध्ये ओतून खुर्चीत बसल्या बसल्या एक एक घोट पिऊ लागला. त्याचं लक्ष पुन्हा ब्रुनोच्या पातेल्याकडे गेलं. ते तसंच ब्रेकफास्टनं भरलेलं होतं. खिडकीशी जाऊन त्यानं पुन्हा शीळ घातली; पण ती हवेत विरण्यापलीकडे काहीच झालं नाही.

शेवटी बेडरूममध्ये जाऊन केरीशी बोलावं, असा विचार करून तो उठला, समोरच्या खिडकीतून सूर्योदयाचं नयनरम्य दृश्य त्याला दिसत होतं, पण त्याचं मन